ठाणे महानगरपालिका,ठाणे.
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १३/११/२००९

मा.स्थायी समिती सभा
सभा सुचना क्र.१५ दिनांक ९/११/२००९
सभा क्रमांक१ दिनांक १३/११/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १३/११/२००९ रोजी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१५ दिनांक ९/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री. भैय्यासाहेब गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सदस्य |
| ४. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ५. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ६ | श्री.सुधीर विष्णु कोकाटे | सदस्य |
| ७ | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ८. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ९. | श्रीमती सुरेखा सुरेख खातु | सदस्या |
| १०. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्य |
| ११. | सौ.कविता सुरेश पाटील | सदस्य |
| १२. | श्री.नजिब सुलेमान मुल्ला | सदस्य |
| १३. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |
| १४. | श्री.यासिन अयुब कुरेशी | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| २. | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |

**वंदेमातरमने सभेची सुरुवात होते.**
**मा.महापालिका सचिव अजेंडा वाचून दाखवितात.**

**श्री.नजिब मुल्ला :-**

मा.सभापती महोदय,आजच्या सभेत आपण वेगवेगळया विषयांवर चर्चा करणार आहोत,शहरी भागातील तातडीचे प्रश्न या समितीसमोर आपण सादर करणार आहोत, मागच्या तीन सभांपासून शहर अभियंता मा.स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहत नाहीत.पाणी खात्यातील अधिकारी उपस्थित नाहीत.वेगवेगळया विभागाचे उपआयुक्त या सभेस उपस्थित नाहीत. अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे आम्हाला कोणत्याही विषयांवर ठोस असे उत्तर प्रशासनाकडून मिळत नाही.माझी आपल्याला विनंती आहे की,अधिकारी सभेला उपस्थित नाहीत याचा निषेध म्हणून ही सभा तहकूब करावी.मला असे वाटते की,यापुढे मा.स्थायी समिती सभा लावतांना अधिका-यांची वेळ घेऊनच लावावी लागेल.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.सभापती महोदय,आजच्या सभेस कार्यकारी अभियंता श्री.पापळकर,रेल्वे लोहमार्ग पोलिसांकडे कोपरी पुल दुर्घटने संदर्भात गेलेले आहेत त्यामुळे ते उपस्थित राहिलेले नाहीत.श्री.वैरागी-कार्यकारी अभियंता यांना महत्वाच्या कामानिमित्त अचानक दिल्लीला जाण्यास सांगितले आहे त्यामुळे ते गैरहजर आहेत.श्री.गुप्ता अतिरिक्त आयुक्त साहेब,श्री.पवार उपआयुक्त(अतिक्रमण) मंत्रालयात एका बैठकीसाठी गेलेले आहेत. श्री.बुरपुल्ले-सहाय्यक आयुक्त,श्री.कोल्हे कार्यकारी अभियंता मानपाडा सर्विस रोड येथे साईटवर आहेत.

**श्री.नजिब मुल्ला :-**

मा.सभापती महोदय,आम्ही शहर अभियंत्याची माहिती मागविली आणि आम्हाला सहाय्यक आयुक्त आणि कार्यकारी अभियंता यांची माहिती देण्यांत आली आहे.

**मा.सभापती महोदय :-**

सचिव महोदया,खरोखरचं ज्यांना काम आहे,जे मंत्रालयात गेले आहेत, हे आम्ही मान्य करतो.माझ्या प्रभागातील कामांकरिता मला पाणी खात्याचे अधिकारी उपलब्ध होत नाहीत.पांडगांवकर कनिष्ठ अभियंता यांच्याकडून प्रत्येक नगरसेवकाला उलट उत्तर दिले जात आहे,अशा व्यक्तीवर लाला साहेब काहीच कार्यवाही करीत नाहीत.पांडगांवकर पाहिजे तसा निधी लोकांना ॲडजेस्ट करुन देत आहेत.

**श्री.नजिब मुल्ला :-**

मा.सभापती महोदय,मागच्या वेळेस सभेमध्ये श्री.पांडगांवकर संदर्भात चर्चा केली होती,समज दिली होती की,पांडगांवकरांनी या समितीच्या सभेला यावे,पण ते आले नाहीत आणि शहर अभियंता सुध्दा आलेले नाहीत.तिनही सभांमध्ये शहर अभियंत्यांचा गैरहजेरीबाबत अर्ज सुध्दा आलेला नाही.

**मा.सभापती महोदय :-**

नगर अभियंत्यांनी माझ्यासमोर पांडगांवकरांना आदेश दिलेला असतानाही,पांडगांवकर फाईल हलवित नाहीत.मी सभापती म्हणून आल्यापासून जास्तीत जास्त वेळा प्रशासनाला सांभाळण्याचा प्रयत्न केला,मी कायदेशीरित्या भांडणारा माणुस आहे,आजपर्यंत मी अधिका-यांमुळे सभा तहकुब होउन दिली नाही,मात्र अधिकारी आता ऐकेनासे झालेले आहेत,त्यामुळे कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार जो मला या खुर्चीने दिला आहे त्याचा मी उपयोग करणार आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**श्री.नजिब मुल्ला :-**

मा.सभापती महोदय,आपण चांग्ल्यारितीने कारवाई करणार यांत शंकाच नाही परंतु आजची ही सभा मात्र आपण तहकुब करावी,कारण येथे कोणतेही प्रश्न आम्हाला मांडता येत नाहीत,शाळांची दुरावस्था झालेली आहे,कामे अर्धवट ठेवलेली आहेत, शहरअभियंता उत्तर दयायला सभेस उपस्थित नाहीत.ज्या दिवशी मा.स्थायी समितीची सभा लागते एक दिवस आधी अधिकारी अर्ज देऊन निघून जातात हे आमच्या निदर्शनास आलेले आहे,असेच होणार असेल तर कामे होणार कशी?

**श्री.हणमंत जगदाळे :-**

मा.सभापती महोदय,सन्मा.सदस्य श्री.नजिब मुल्ला यांनी या सभागृहामध्ये वास्तविक पाहता स्थायी समितीची सभा आणि अधिका-यांची उपस्थिती हा प्रश्न वारंवार चर्चेला येत असतो,स्थायी समितीच्या सभेमध्ये,मा.आयुक्तांनी सुध्दा स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.कारण या सभेमध्ये चर्चेला जे विषय येतात ते शहराच्या विकासाच्यादृष्टीकोनातून महत्वाचे असतात,हे अतिशय महत्वाचे सभागृह मानले जाते.सन्मा.सदस्य श्री.नजिब मुल्ला यांनी उल्लेख केल्याप्रमाणे गेल्या तीन सभेला मा.नगर अभियंता हे उपस्थित नव्हते,याबाबत सभापतींनी सांगितले की,खेदाने आम्हाला अशा अधिका-यांविरुध्द कारवाई करावी लागणार आहे.आमच्या सर्व सदस्यांचा हा अपमान आहे,काही गोष्टी आपल्याला खेदाने मांडाव्या लागतात.अशा प्रकारे प्रशासन जर वागत असेल तर या सभागृहात बसून आम्ही जी चर्चा करतो त्या चर्चेला कोणत्याही प्रकारचा अर्थ राहणार नाही.या सभागृहात झालेली चर्चा त्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे,त्या दृष्टीकोनातून प्रशासनाने पाऊले उचलणे गरजेचे आहे परंतु तसा कल प्रशासनाचा दिसत नाही,आपल्या नियोजनामध्ये तसा स्पष्ट उल्लेख झालेला आहे.आमचे सहकारी नजिब मुल्ला यांनी स्पष्टपणे सांगितले की,नगर अभियंता यांच्याकडे बरेचसे विभाग आहेत,त्यापैकी बांधकाम विभाग आहे बांधकाम विभागाशी सलंग्न बरेचशे विषय या सभागृहात चर्चेला येत असतात,नगर अभियंता स्वतः उपस्थित राहत नसतील,जल अभियंता म्हणून जवांदे साहेब आहेत,ते सातत्याने गैरहजर असतात,पाण्या सारखा महत्वाचा प्रश्न त्याबाबत सन्मा सदस्यांना आपापल्या विभागातील समस्या मांडायच्या असतात,अशा वेळेला संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत. याबाबत मा.पाटील साहेब आयुक्त म्हणून तुम्ही येथे बसलेले आहात आपण याचा गांर्भीयाने विचार करणे गरजेचे आहे. गेल्या आठवडयात मा.महापौरांकडे या संदर्भात सभा सुध्दा झालेली आहे, त्यावेळी या संदर्भात आम्ही प्रश्न सुध्दा उपस्थित केला होता की, आपल्याला पाणी खात्यासाठी पुर्णवेळ अधिकारी असणे गरजेचे आहे,पाण्यासारखा प्रश्न सर्व विभागांमध्ये अत्यंत गरजेचा असा आहे.याबाबतीत आपल्याला लवकरात लवकर निर्णय घ्यावा लागणार आहे. तो अधिकारी ठेवायचा असेल तर तो अधिकारी ठेवा किंवा दुसरा अधिकारी आणायचा असेल तर दुसरा अधिकारी नेमा किंवा आपल्या मधील एखादया अधिका-यांची तेथे नेमणुक करा. आपले अधिकारी सुध्दा सदर पदाचा भार सांभाळण्यास सक्षम आहेत.तत्कालिन आयुक्त चंद्रशेखर यांच्या काळात स्वच्छ शहर ठाणे,सुंदर शहर ठाणे हे जे आज आपल्याला पाहावयास मिळत आहे त्याकरिता आमच्या अधिका-यांनी १०-१०,११-११ वाजेपर्यंत कामे केली म्हणून पाहावयास मिळत आहे. त्यादृष्टीकोनातून आपण विचार करायला पाहिजे.हया स्थायी समितीच्या सभेत अशा प्रकारचे वर्तन अधिका-यांकडून होत असेल तर ते निंदनीय आहे.मा.स्थायी समितीची सभा ही प्रशासनाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाची मानली जाते.कारण या समितीमध्ये जे आपण निर्णय घेतो ते प्रशासनाला सुध्दा बंधनकारक असतात. अशा वेळेस जर अधिका-यांची अनुपस्थिती असेल,आपण जो काही निर्णय घेतो त्याला प्रशासनाकडून साथ मिळत नाही अशा प्रकारचे चित्र यामध्ये निर्माण होत असेल तर नजीब मुल्ला यांनी मांडलेली जी तहकुबी आहे त्याला मी पुर्णपणे अनुमोदन देतो.ही सभा पूर्ण वेळ तहकुब करावी अशी मी विनंती करतो. सभा तहकुबीने हे प्रकरण मिटणार नाही अशा प्रकारचे वर्तन आपल्या माध्यमातून मी मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणतो,अशा प्रकारचे वर्तन पुन्हा घडू नये. अशी वेळ पुन्हा येऊ देऊ नये याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

**श्री.दिलीप बारटक्के :-**

मा.सभापती महोदय,अधिका-यांच्या अनुपस्थितीमुळे तहकुबी मांडण्यात आलेली आहे.हया वर्षामध्ये निवडणुकीमुळे- आचारसंहितामुळे शहरातील कामे रखडली आहेत.आज मागासवर्गीय निधीमुळे नगरसेवकांची कामे अडलेली आहेत.या सगळया गोष्टींचा विचार करुन सभागृहांमध्ये शहरातील कामांसंदर्भात चर्चा होणे गरजेचे आहे. मी सभापतींना अशी विनंती करतो की,जी सभा तहकुबी सन्मा.सदस्यांनी मांडलेली आहे ती अर्धातास किंवा २० मिनिटे तहकुब करुन पुन्हा सभा चालू करावी.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,आजच्या मा.स्थायी समितीच्या सभेला बरेचसे वरिष्ठ अधिकारी उपस्थित नाहीत, तेव्हा निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिका-यांना विलंब होत आहे. आणि सभागृहात दिलेली आश्वासनाची पूर्तता होताना आढळून येत नाही.मागच्या आठवडयामध्ये हायकोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे या शहरातील अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी विशेष मोहिम प्रशासनाने सुरु केली ती सुरु करीत असताना गार्डन विभागाचे बरेचसे कर्मचारी त्यांनी अतिक्रमणला पाठविले,आज गार्डन विभागाची स्थिती काय आहे? बगीच्यांची,चौकांची स्थिती काय आहे?हे प्रशासनाने गृहित धरलेच नाही का?येत्या आठ-दहा दिवसांमध्ये पाऊस पडला आहे.त्यामुळे त्या गार्डनला, चौकामध्ये पाणी दयायला कर्मचा-यांची आवश्यकता भासणार नाही. असे प्रशासनाने गृहीत धरुन गार्डन विभागाचे सर्व बिगारी हे अतिक्रमणला पाठविले,हया १४४ इमारती तोडायच्या आहेत,त्या इमारती दोन दिवसांत काही उभ्या राहिलेल्या नाहीत.प्रशासन हायकोर्टाच्या आदेशाने त्या तोडण्यासाठी आटापिटा करीत असताना,ज्याच्या अधिपत्याखाली हया बिल्डींग उभ्या राहिल्या,ज्या प्रभाग समित्यांमध्ये जबाबदार अधिकारी तेथे कार्य करीत आहेत,त्यांच्या अधिपत्याखाली त्या परिक्षेत्रामध्ये इमारती उभ्या राहिल्या,त्या पंधरा दिवसांत आणि एक महिन्यात इमारती उभ्या राहिल्या नाहीत.याबाबत प्रशासन कुठल्याही प्रकारे स्वतः वाच्छाता करायला कबूल नाही,वास्तविक निरनिराळया वेळेला स्थायी समिती सभागृहामध्ये,महासभेमध्ये संबंधित प्रभाग समित्याच्या अधिका-यांवर तेथील लिपिकावर तेथील स्वच्छता निरीक्षकावर,आम्ही या जबाबदा-या सोपविलेल्या आहेत आणि भविष्यात कोठलेही अतिक्रमण या प्रभाग समित्यात होणार नाही अशी प्रशासनाने टिपण्णी केलेली आहे,त्या टिपण्णीचे काय झाले? प्रशासनाने या शहरामध्ये काम करीत असताना सिहांवलोकन करुन मागे वळून बघणे गरजेचे आहे.ते बघितले जात नाही ही खेदाची गोष्ट आहे. कळवा हॉस्पीटलमध्ये एक दिवसांचा डॉक्टरांचा संप आहे,आजच्या सभेला मा.आयुक्त,मा.अतिरिक्त आयुक्त असते तर आज त्याबाबत निर्णय घेता आला असता,कारण दोन-चार महिने या कळवा हॉस्पीटलची परिस्थिती अत्यंत बिकट झालेली आहे.प्रशासनाने वेळच्या वेळी निर्णय घेतला असता तर बरे झाले असते.तेथे कोणताही रुग्ण पाठवा डॉक्टर त्याला सायन किंवा के.ई.एम. ला पाठवितात,गोरगरीबानां सायन आणि के.ई.एमला जाण्या येण्याच्यादृष्टीकोनातून परवडत नाही,म्हणून सिव्हील आणि छत्रपति शिवाजी महाराज रुग्णालय यांची या ठाणे शहरात सोय करण्यांत आली आहे.परंतु कळवा हॉस्पीटलची परिस्थिती खुपच दयनिय आहे,दोन-चार दिवसांपूर्वी मी तेथे गेलो असताना तेथील लिपीक श्री.सराफ यांने चार खिडक्यां आहेत त्याने तीन लिपीकांच्या रजा मंजूर केला आणि एकच खिडकी चालू ठेवली,वास्तविक ही सर्व जबाबदारी केंद्रेसाहेब या अनुशंगाने तुमचीही आहे.एकाच वेळेस तीन खिडक्यांच्या लिपीकांची रजा मंजूर करु नये,कारण लोड एकाच लिपीकावर येईल.लांबच्या लांब रांगा त्या खिडकीसमोर लागलेल्या होत्या.याचा विचार केला तर सन्मा.सदस्य श्री.नजीब मुल्ला आणि जगदाळे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे नगर अभियंता आजच्या सभेस उपस्थित राहणे आवश्यक होते.कामांचे नियोजन प्रशासनाने करावयाचे आहे. मा.स्थायी समितीत निर्णय घेत असताना,फक्त आर्थिक निर्णय घेण्यासाठी ही स्थायी समिती नाही.परंतु या शहरात इतर ज्या काही समस्या निर्माण होतात त्या पाण्याच्या असतील,साफसफाईच्या असतील,आज आपली डंपिंगची समस्या किती बिकट झालेली आहे,पोलिसांनी काल पोलिस बंदोबस्त कबुल केला होता परंतु काल पोलिस डिपार्टमेंटकडून पत्र येते की,पोलिस बंदोबस्त मिळणार नाही. या सर्व समस्याचा उलगडा करायचा असेल तर एक महिना महासभेला थांबण्यापूर्वी प्रत्येक आठवडयाला स्थायी समितीमध्ये अधिकारी उपस्थित

राहिले तर तेथे निर्णय घेणे शक्य आहे.परंतु दुदैवाने अधिका-यांना वाटते की,स्थायी सिमतीच्या सभेला नाही गेलो तरी चालते,ते सभा टाळण्याचा प्रयत्न करतात ही वस्तुस्थिती आहे,काही अधिकारी ज्या वेळेस स्थायी समिती असते तेव्हा दोन दिवस आधीच आजारी पडतात आणि सकाळी फोन येतो की आज आजारी आहेत त्यामुळे सभेस येउु शकत नाहीत.सदस्यांना ज्योवळी त्या पक्षाने या सभागृहात पाठविले त्या वेळेस त्या त्या अखत्यारितील समस्यांवर विचार व्हावा त्या समस्यांचे निराकरण व्हावे हा त्यामागचा उद्देश होता. कारण महासभा ही महिन्यातून एकदाच होते,परंतु आज दुदैवाने जे निर्णय घेणारे अधिकारी आहेत ते आजच नाहीत तर मागच्या दोन सभांना सुदधा उपस्थित नव्हते. म्हणून माझी तुम्हाला विनंती असेन की,आपली जी तहकुबी आहे ती मागे घेण्यांत यावी आणि या अधिका-यांना समज देण्यांत यावी.इतर जे अधिकारी आलेले आहेत ते आपल्या विभागातील कामकाज थांबवून येथे सभेला उपस्थित राहीलेले आहेत त्याचा विचार करण्यांत यावा.जे दोन-चार अधिकारी अनुपस्थिती आहेत त्याच्याविरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये आपल्याकडे जो अधिकार आहे त्यानुसार आपण कारवाई कराल,परंतु ते करीत असताना सभागृहाचा वेळ जाणार नाही आणि इतर अधिकारी जे आपला अमुल्य वेळ देऊन येथे उपस्थित राहिलेले आहेत त्यांच्याही कामाला गती मिळेल यादृष्टीने पाऊले उचलणे आवश्यक आहे. मा.सभापती महोदय, या ठिकाणी पेव्हर ब्लॉक संबंधात हायकोर्टाचा आदेश आलेला आहे त्यांचा इथे खुलासा कोण करणार आहे,पेव्हर ब्लॉक चे काही विषय या विषयपत्रिकेवर आहेत त्याबाबतीत निर्णय कोण घेणार आहे?या सर्वाच्या भावना लक्षात घेऊन मी विनंती करतो की,सन्मा.सदस्यांनी आपली तहकुबी मागे घ्यावी.

**श्री.नजिब मुल्ला :-**

मा.सभापती महोदय,उपआयुक्त(महसुल) सभेस उपस्थित नाहीत, रस्ते व विशेष प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता उपस्थित नाहीत.या समितीच्या सभेत आम्ही कधीही कोणत्याही विषयाला ताणून धरलेले नाही,किंवा अडथळा आणण्याचाही प्रयत्न केला नाही.आम्ही प्रत्येक वेळी आपला मान ठेवला आहे आणि आपण दिलेली सुचना मान्य केलेली आहे.या आर्थिक वर्षात दोन वेळेस आचारसंहिता लागली त्यामुळे कामांवर खुप परिणाम झालेला आहे.माझी विनंती आहे की,आजची सभा तहकूब करावी.

**मा.सभापती :-**

सर्व सदस्यांचा कल पाहता जबाबदार अधिकारी सतत गैरहजर राहत असतात आणि या विषयांवर माजी सभापती श्री.इंदिसे यांनीही अनेक वेळा या सभागृहात चर्चा घडविली आहे, तरी सुध्दा अधिका-यांवर काही परिणाम पडलेला नाही,ज्या अधिका-यांबद्दल ते बोलत होते त्याच अधिका-यांबद्दल एवढा गदारोळ होऊन सुध्दा अजूनही त्यांच्यामध्ये फरक पडत नाही. म्हणून सभागृहातील सदस्यांचे मत लक्षात घेता ही सभा पूर्ण वेळ तहकूब करण्यांत येत आहे.

**(तद्नंतर मा.सभापती महोदय दुपारी ठिक १२.२० वा.सभा तहकूब झाल्याचे जाहीर करतात.)**

**सभापती,**
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा तहकुब झाल्याची वेळ :- दु.१२.२० वा.
दिनांक :- १३/११/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.